# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०८/२०१५/ १३२ दिनांक- ०८.०५.२०१५

अपील क्र. मविनिआ/माअअ/अपील/०८/२०१५

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री. क. छ. जळगावकर<br>३०, महावीर नगर, पारोळा<br>जिल्हा जळगाव - ४२५ १११ |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | २०.०२.२०१५ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | १७.०४.२०१५ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०९.०४.२०१५ |

**मागितलेली माहिती :**

| अ.क्र. | आवश्यक माहितीचा तपशील | खुलासा |
|---|---|---|
| १ | बीपीएल ग्राहकांसाठी मागणी अधिभार रु.१०/- जोडणी व वीजआकार... | आपणांस आवश्यक असलेली संबधीत माहितीची कागदपत्रे आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.<br>(या दस्तऐवजामध्ये एकूण ३५२ पृष्ठे आहेत). |
| २ | बिगर बीपीएल ग्राहकांसाठी युनिट १ ते १०० साठी मागणी अधिभार... | |
| ३ | बिगर बीपीएल ग्राहकांसाठी युनिट १०१ ते ३०० साठी मागणी अधिभार... | |
| ४ | बिगर बीपीएल ग्राहकांसाठी युनिट ३०१ ते ५०० साठी मागणी अधिभार... | |
| ५ | बिगर बीपीएल ग्राहकांसाठी युनिट ५०१ ते १००० साठी मागणी अधिभार... | |
| ६ | बिगर बीपीएल ग्राहकांसाठी युनिट १००० च्या पुढे अधिभार रु.४०/- जोडणी व वीजआकार रु. ४०/- जोडणी व वीजआकार ११.३८+ इं.स.आ. हा दर कसा ठरवला गेला आहे? कृपया याची संपूर्ण आकडेमोड(calculations) द्यावी. | |

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. मविनिआ/माअअ/२२/२०१५/०००५२ दि.१७.०४.२०१५ नुसार अपिलार्थी यांना दिलेली माहिती येणे प्रमाणे -

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| ३५२ | २ | ७०४ | अंदाजे रु.२०० | ९०४/- |
| | | | **एकूण रु.** | **९०४/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत. किंवा संबधित माहिती आयोगाच्या www.merc.gov.in आणि www.mercindia.org.in या संकेत स्थळांवर मोफत उतरवून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

कोणत्याही प्रकारचे प्रत्युत्तर नसल्याने प्रथम अपील करावे लागत आहे.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. ३०.०४.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी हे गैरहजर होते व जन माहिती अधिकारी हे रजेवर होते.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. २०.०२.२०१५ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.०४.२०१५ रोजी अपिलार्थी यांना उत्तर/माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपिलार्थी यांनी दाखल केलेले अपील हे दि.०९.०४.२०१५ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झालेले आहे यावरुन असे निदर्शनास येते की, अर्जदार/अपिलार्थी यांना माहिती विहित मुदतीच्या नंतर प्राप्त झालेली आहे.

माहिती जन अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या संबंधाने पुरविलेली माहिती योग्य आहे व त्यांनी पारित केलेला आदेश कायम ठेवण्यात येत आहे करिता सदरहु अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा**
**प्रथम अपीलीय अधिकारी.**

प्रत- जनमाहिती अधिकारी, मविनिआ, यांना माहितीसाठी.